# नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची दि.30/04/2026 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक 30/04/2026 रोजी डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली. बैठकीत उपस्थितांची यादी आणि विषयपत्रिका (agenda) सोबत संलग्न आहे. कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव यांनी सर्व प्राधिकरण सदस्यांचे स्वागत केले आणि बैठकीला सुरुवात झाली. सादरीकरणाची प्रत सोबत आहे.

**विषय क्र. 1:- दिनांक 10/03/2026 रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा आयुक्त यांनी दि.10/03/2026 रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताला मान्यता देण्याबाबत सर्व प्राधिकरण सदस्यांना विनंती केली. त्यानुसार प्राधिकरणाच्या बैठकीच्या इतिवृत्ताला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

त्याचप्रमाणे विषयसुचीनुसार मान्यता देण्यात येणाऱ्या सर्व कामांना मंत्री समिती / शिखर समिती यांनी मान्यता दिल्याची खात्री करण्यात आली आहे काय याबाबत चर्चा झाली त्यानुसार कुंभमेळा आयुक्त यांनी सदर बाबींची खात्री करण्यात आली असल्याची बाब निदर्शनास आणून दिली.

**विषय क्र. 2:-**

सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका, नाशिक
जिल्हा रुग्णालय, नाशिक अंतर्गत
आरोग्य विभाग, जि.प. नाशिक अंतर्गत
a) तात्पुरत्या स्वरुपात चिकित्सालय ( Rental Tent- Hospital, ICU, OPD) उभारणे.

उपरोक्त विषयांवर उपसंचालक, आरोग्य सेवा कार्यालयातील प्रभारी उपसंचालक यांनी तात्पुरत्या स्वरुपात चिकित्सालय उभारणेबाबत आवश्यक माहिती दिली. त्यानुषंगाने मा.अध्यक्ष यांनी सदर प्रस्तावांना तांत्रिक मान्यता मिळाल्याची खात्री केल्याबाबत विचारणा केली तसेच प्रस्तावित चिकित्सालयासाठी वापरण्यात येणारे साहित्य कोणत्या प्रकाराचे असणार व त्याचा वापर रुग्णांसाठी करणे कितपत संयुक्तिक होईल याबाबत प्रभारी उपसंचालकांचे मत जाणून घेतले. त्याचप्रमाणे सदर चिकित्सालय हे भाडेतत्वावर घेण्यात येणार आहे किंवा खरेदी करण्यात येईल व दोनही पैकी कोणती बाब किफायतशिर असेल याबाबत प्रभारी उपसंचालक, आरोग्य सेवा यांनी तुलनात्मक अभ्यास केला आहे काय अशी विचारणा मा.अध्यक्ष यांनी केली. यावर प्र.उपसंचालक यांनी त्यांचे स्तरावर भाडेतत्वावर उभारण्यात येणारे तात्पुरते चिकित्सालय हे किफायतशीर असेल असे नमूद केले व सदर कामांची निविदा प्रक्रिया ही उपसंचालक, आरोग्य सेवा यांच्या स्तरावर राबविण्यात येणार असल्याचे नमूद केले. तसेच तात्पुरत्या चिकित्सालयांबाबत चर्चा होत असतांना ते टिन शेडचे असल्याचे प्रभारी उपसंचालक, आरोग्य सेवा यांनी सांगितले. यावर पुन्हा आपले स्तरावरुन योग्य निर्णय घेऊन फेरसादर करावे असे अध्यक्षांनी सुचित केले.

**विषय क्र.** 2 :-

सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका, नाशिक

जिल्हा रुग्णालय, नाशिक अंतर्गत

b) आपत्ती अनुषंगाने वैद्यकीय सेवांचे सक्षमीकरण आणि क्षमता बांधणी

उपरोक्त विषयांवर उपसंचालक, आरोग्य सेवा कार्यालयातील प्रभारी उपसंचालक यांनी आपत्ती अनुषंगाने वैद्यकीय सेवांचे सक्षमीकरण आणि क्षमता बांधणी या कामांचे सादरीकरण केले असता मा. अध्यक्ष यांनी सदरील कामे पूर्णत: नविन आहेत की अद्ययावतीकरणाची आहेत याबाबत विचारणा केली. त्यावर प्रभारी उपसंचालक, आरोग्य सेवा यांनी सदरील कामे ही पूर्णत: अद्ययावतीकरण स्वरुपाची असल्याचे नमूद केले.

सदर कामांच्या बाबतीत अद्ययावतीकरण हे वेगवेगळया स्वरुपाचे असल्याने सदर कामांचे एकत्रीकरण करण्याऐवजी यंत्रणानिहाय त्यांचे स्तरावर निविदा प्रक्रियेबाबत उचित निर्णय घ्यावा असे मा.अध्यक्ष यांनी निर्देश दिलेत. त्याचप्रमाणे आरोग्य विभागाअंतर्गत औषध खरेदीसाठी स्थापन झालेले राज्य स्तरावरील केंद्रीय खरेदी कक्षाला संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करुन योग्य निर्णय घ्यावा असे सुचित केले.

बैठकीत चर्चा आणि विषयांचे सादरीकरण होत असतांना बैठकीपूर्वी वितरीत केलेली विषयसूची आणि होत असलेले सादरीकरण यात सुसुत्रता नाही असे निदर्शनास आले. त्याबाबत आपणास आणखी अभ्यास करुन माहिती सादर करावयाची असल्यास तसे करता येईल असे मा. अध्यक्षांनी सुचविले असता त्यानुसार याबाबत अभ्यासानंतर पुढील बैठक लावावी अशी विनंती प्रभारी उपसंचालक, आरोग्य सेवा यांनी केली. त्यानुसार पुढील बैठक घेण्याचे सर्वानुमते ठरले.

तसेच यापुढे सर्व संबंधित विभागांनी प्राधिकरणाकडे सादर करण्यात येणारे प्रस्तावांवर सर्वंकष अभ्यास करुनच (सर्व बाबी जसे तांत्रिक मान्यता, नकाशे इ., आराखड्यात समाविष्ट आहे किंवा कसे? व त्यास मंत्री समिती/ शिखर समितीची मान्यता आहे काय इ,.) प्रस्ताव सादर करावेत.

कुंभमेळा आयुक्त यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून बैठक समाप्त करण्यात आली व हे विषय लवकरच चर्चेसाठी घेण्यात येतील असे जाहीर केले.

Digitally signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 18-05-2026 19:51:47

**(डॉ.प्रवीण गेडाम)**
**अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा**
**विभागीय आयुक्त, नाशिक**